# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २६.०५.२०२३ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— घरफोडीचे ०७ गुन्हे उघडकीस, आरोपींना अटक करून २३,७०,२८५/—रू. चा मुद्देमाल जप्त.**

दिनांक ०४.०५.२०२३ चे २१.०० वा ते २१.४० वा. दरम्यान पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट न. ३५, सुर्योदय नगर, रेवती अपुर्वा सोसायटी, हुडकेश्वर रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नरेन्द्र बळीराम कोहाड वय ६३ वर्ष, हे आपले घराला कुलुप लावुन, शेजारी राहणारे मुलाचे लग्नाचे रिशेप्शन करीता स्वामी समर्थ सभागृह हुडकेश्वर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे वाल कंपाउंड वरून आत प्रवेश करून घराचे किचन रूमचे लोखंडी चॅनल गेटचे लॉक तोडुन, किचन रूमचे लाकडी दरवाज्याचे फ्रेमचा कब्जा तोडुन दार उघडुन घरात प्रवेश करून, घरातील बेडरूम मधील लाकडी अलमारी उघडुन त्या मधील सोन्याचे दागिने, लहान गोदरेज तिजोरी व रोख ४५,०००/रू असा एकुण १७,००,०००/ रू चा मुद्देमाल चोरून नेला.

यात्प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम ४५७, ३८०, भादवि अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीचा शोध सुरू होता.

गुन्ह्याचे तपासात हुडकेश्वर पोलीसांनी तांत्रीक दृष्टीने तसेच, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून **आरोपी शुभम उर्फ मुन्नी चंद्रशेखर मुन, वय २५ वर्षे, रा. सोमवारी कॉर्टर, तूकडोजी पुतळ्या जवळ, नागपुर** यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने सदरचा गुन्हा त्याचा **साथीदार आरोपी नामे राकेश उर्फ ढोक सुनिल लखोटे, वय ३४ वर्षे, रा. शताब्दी नगर, रामेश्वर रिंगरोड, अजनी, नागपुर** याचेसह केल्याचे सांगीतले. यावरून दोन्ही आरोपींना अटक करून त्यांचा मा. न्यायालयातुन पि.सी.आर. प्राप्त करून अधिक विचारपुस करता, त्यांनी या गुन्ह्याव्यतीरीक्त पो.ठाणे हुडकेश्वर अंतर्गत इतर ०७ घरफोडीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. यावरून दोन्ही आरोपींकडुन गुन्ह्यात चोरी गेलेले सोन्याचे दागिने, लहान गोदरेज तिजोरी, गुन्ह्यात वापरलेली सलाख, दुचाकी ॲक्टीवा वाहन व दागिने विक्री करून मिळालेली रोख रक्कम असा एकुण २३,७०,२८५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील कामगिरी मा. पोलीस उपायुक्त श्री. विजयकांत सागर, परी. क्र. ०४, सपोआ. श्री गणेश बिराजदार, वपोनि. जागवेंद्रसिंग राजपुत, पोनि. विक्रांत सगणे (गुन्हे), यांचे मार्गदर्शनात पोउपनि. प्रशांत राऊत, प्रमोद खंडार, सफौ. शैलेष ठवरे, नृसिंह दमाहे, नापोअं. राजेश मोते, राजेश धोपटे, आशिष तितरमारे, गणेश बोंदरे, चंद्रशेखर कौरती, मुकेश कन्हाके, पवनकुमार लांबट, प्रदिप भदाडे, दिपक तऱ्हेकर, मनापोअं. वंदना काकडे यांनी केली.

**(गुन्हे)**

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान:— घरफोडी करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा दाखल**

दिनांक १९.०५.२०२३ चे ००.०० वा. ते दि. २४.०५.२०२३ चे १०.०० वा. चे दरम्यान पो. ठाणे गिट्टीखदान हद्दीत गोकुल सोसायटी, कान्हार रेजन्सी फ्लॅट नं. १०१, गोरेवाडा, नागपुर येथे राहणारे फिर्यादी रंजनकुमार शर्मा, वय ३७ वर्षे, हे घराला कुलुप लावुन परीवारासह बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात

चोरटयाने त्यांच्या घराचे मुख्य दाराचे कुंडी तोडुन घरात प्रवेश करून बेडरूम मधील कपाटामध्ये ठेवलेले सोने, चांदीचे दागीने असा एकुण किमती अंदाजे ४,४५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.ठाणे गिट्टीखदान येथे सपोनि. धोकटे ९५२७७७४३३६ यांनी अज्ञात आरोपी विरूध्द कलम ४५४,४५७,३८० भादवि. अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीचा शोध घेत आहे.

**( अकस्मात मृत्यु )**

**पोलीस ठाणे बेलतरोडी : —** दिनांक २५.०५.२०२३ चे १६.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत चिचभवन वस्ती बाबुराव बोबडे शाळेजवळ बेलतरोडी, नागपूर येथे राहणारी कु. आकांशा अर्जुन सोनबरसे वय १७ वर्ष ही १२ वी चे परीक्षेत नापास झाल्याने तणावामध्ये घरी कोणी नसतांना पंख्याचे हुकला साडीने गळफास घेवून आत्महत्या केली.

यापकरणी फिर्यादी चंद्रभान धम्मदास सोनेकर वय २८ वर्ष रा. चिचभवन वस्ती, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि डाखोरे ८८८८८६५१७३ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर शहर.**